सत्यमेव जयते

# प्रमाणलेखन नियमावली

भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन
मुंबई.

# प्रमाणलेखन
# नियमावली

पहिली आवृत्ती : १९८७

पुनर्मुद्रण : १९९३

पुनर्मुद्रण : २०१२

किंमत : सहा रुपये

मुद्रक : व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
पुणे ४११ ००१.

# दोन शब्द

भाषा संचालनालयाने प्रशासनिक लेखनाला उपयुक्त होईल अशा प्रकारचे साहित्य या अगोदर शासकीय कर्मचाऱ्यांकरिता उपलब्ध करून दिले आहे. या पुस्तिकेचा उद्देश, शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात मराठी शुद्धलेखनाच्या बाबतीत योग्य मार्गदर्शन व्हावे हा आहे. प्रशासनिक लेखन (१९६६), कार्यदर्शिका (१९८१) या पुस्तकांमध्ये शुद्धलेखनाचे नियम समाविष्ट आहेतच. त्यात आवश्यक त्या सुधारणा करून व भर घालून ही पुस्तिका शक्य तितकी अद्ययावत करण्यात आली आहे.

पुस्तिका तयार करताना प्रामुख्याने मराठी साहित्य महामंडळाने १९७२ मध्ये प्रसिद्ध केलेली "लेखनविषयक नियम" ही पुस्तिका आणि श्री. मो. रा. वाळंबे यांचे व्याकरणविषयक साहित्य यांची फार मदत झाली.

इंग्रजीतून लिहिताना इंग्रजी शब्दांच्या "स्पेलिंग" विषयी व व्याकरणाविषयी आपण जेवढे जागरूक असतो तेवढेच मराठी लेखनाबाबतही असले पाहिजे. नियमांनुसार लेखन करणे ही भाषेची अस्मिता जपण्याचाच एक भाग असतो. मराठी आता या राज्याची अधिकृत भाषा झालेली असल्यामुळे या राजभाषेची प्रतिष्ठा सर्वच बाबतीत राखली जाईल हे पाहणे प्रत्येक मराठी भाषिकाचे कर्तव्य ठरते. प्रस्तुत पुस्तिका यादृष्टीने उपयोगी ठरेल असा विश्वास वाटतो.

(शंकरराव चव्हाण)
मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

## प्रास्ताविक

महाराष्ट्र राज्याचे "सांस्कृतिक धोरण - २०१०" या अनुसार, "लेखनाच्या बाबतीत सर्वत्र आणि विशेषतः अध्ययन-अध्यापन या क्षेत्रात प्रमाणलेखनास शुद्धलेखन संबोधले जाते. त्याऐवजी प्रमाणलेखन असे संबोधण्यात येईल." असे ठरविण्यात आले आहे. त्यामुळे प्रस्तुत नियमावलीचे पुनर्मुद्रण करताना "शुद्धलेखन नियमावली" याऐवजी "प्रमाणलेखन नियमावली" असा शीर्षकामध्ये बदल करण्यात आला आहे.

सदर नियमावली शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व प्राध्यापकांना, सर्व संबंधित शासकीय विभागांना तसेच अभ्यासकांना व जिज्ञासू वाचकांना उपयुक्त व मार्गदर्शक ठरेल असा विश्वास वाटतो.

**ललिता शि. देठे,**
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.

**भाषा संचालनालय,**
मुंबई-४०० ०५१.
दिनांक : २६.०१.२०१२
प्रजासत्ताक दिन

## उपोद्घात

"शुद्ध कसे बोलावे व शुद्ध कसे लिहावे" हे सांगण्यासाठी दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी मराठीचे व्याकरण लिहिले. त्यात अर्थातच मराठी लेखनाचा विचार केलेला होता. दादोबांच्या व्याकरणाला जवळजवळ दीडशे वर्षे होत आली. कालांतराने तत्कालीन शुद्धलेखनाच्या नियमांत अनेक बदल झाले. अनुस्वार, ऱ्हस्व व दीर्घ यांच्या व्यवस्थेलाच स्थूलमानाने शुद्धलेखन हा शब्द योजला जातो.

अनुच्चारित अनुस्वार लिहू नयेत हा विचार प्रथम श्री. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांनी मांडला. पुढे साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी टिळकचरित्राचा दुसरा व तिसरा खंड छापताना अनुच्चारित अनुस्वारांना फाटा दिला. त्यानंतर बेळगाव साहित्य संमेलनाने (१९२९) नेमलेल्या शुद्धलेखन मंडळाने आपले स्वतःचे नवे नियम तयार केले. या नियमांना गोवे साहित्य संमेलनाने मान्यता दिली. या नियमांचा साकल्याने विचार करता असे दिसून येते की, नव्या शुद्धलेखनानुसार अर्थभेदास आवश्यक असतील अशा अनुस्वारांखेरीज इतर सर्व अनुस्वार गाळण्याला परवानगी दिलेली आहे. तथापि, नव्या शुद्धलेखनाच्या अनुस्वारविषयक इतर नियमांत हे धोरण काटेकोरपणे पाळले न गेल्याने बऱ्याच विसंगती निर्माण झाल्या. तेव्हा या नियमांचा पुनर्विचार करून विदर्भ साहित्य संघाने सुधारित नियमांचा आराखडा तयार केला. या सुधारित नियमांना महाराष्ट्र साहित्य परिषदेनेही मान्यता दिली.

१९६० मध्ये महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतर, मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा देण्यात आला. मराठीकरणाच्या पूर्वतयारीसाठी नेमलेल्या भाषा सल्लागार मंडळाने शुद्धलेखनाच्या नियमांबाबत चर्चा करून नियमांचा एक नवीन आराखडा तयार केला. या नियमांना, त्यांत थोडाफार बदल करून, मराठी साहित्य महामंडळाने मान्यता दिली. मराठी साहित्य महामंडळ हे महाराष्ट्रातील साहित्य संस्थांचे प्रातिनिधिक मंडळ असल्यामुळे त्याने केलेल्या नियमावलीला, राज्य शासनानेही मान्यता देऊन राज्यकारभारात व शिक्षणाच्या सर्व क्षेत्रांत तिचे पालन करण्याचे ठरविले. या सरकारमान्य नियमांचे सर्वसाधारणपणे 'उच्चारानुसारी लेखन' हे प्रमुख वैशिष्ट्य आहे. या नियमांचा अवलंब केल्याने मराठीचे लेखन, टंकलेखन, मुद्रण जलद गतीने तर होतेच, त्याशिवाय वाक्यांचा परस्पर संदर्भ लक्षात घेता अर्थहानीही होत नाही. या नवीन नियमांचे स्पष्टीकरण या पुस्तिकेत केले आहे.

# शुद्धलेखनाचे नियम

## (१) अनुस्वार

**नियम १ :** स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू द्यावा. उदाहरणार्थ–गुलकंद, चिंच, तंटा, निबंध, आंबा. तत्सम शब्दातील अनुनासिकाबद्दल विकल्पाने पर-सवर्ण लिहिण्यास हरकत नाही.

ङ्, ञ्, ण्, न्, म् यांना अनुनासिके म्हणतात. जेथे या अनुनासिकांचा उच्चार स्पष्ट होत असेल तेथे त्या अनुनासिकांबद्दल अनुस्वार (शीर्षबिंदू) देण्यात येतो. जसे–तंटा, चिंच, आंबा, अंतर्गत, अर्थसंकल्प, इत्यादी. या शब्दांत अनुनासिकांचा उच्चार स्पष्ट होत असल्यामुळे येथे आधीच्या अक्षरावर अनुस्वार द्यावयाचा आहे. संस्कृतातून मराठीत जसेच्या तसे आलेले शब्द (म्हणजेच तत्सम शब्द) अनुनासिक वापरूनही लिहिण्याची प्रथा आढळते. उदा.–'पंडित' हा शब्द 'पण्डित' किंवा 'अंतर्गत' हा शब्द 'अन्तर्गत' असा लिहिला तर ते चूक ठरणार नाही. परंतु अशा वेळी अनुस्वारानंतर येणाऱ्या अक्षराच्या वर्गातील अनुनासिकच (म्हणजेच पर-सवर्ण) वापरावे लागते. संस्कृत नसलेले मराठी शब्द शीर्षबिंदू देऊनच लिहावेत. उदा.–दंगा, तांबे, खंत, संप इत्यादींसारखे शब्द दङ्गा, ताम्बे, खन्त, सम्प असे लिहू नयेत. पर-सवर्ण लिहिण्याची सवलत फक्त तत्सम शब्दांपुरती मर्यादित आहे.

अर्थभेद स्पष्ट करण्यासाठी कधी कधी पर-सवर्ण जोडून शब्द लिहिणे योग्य ठरते. उदा.– 'वेदांत' (वेदांमध्ये) आणि 'वेदान्त' (तत्त्वज्ञान), 'देहांत' (शरीरांत) आणि 'देहान्त' (मृत्यू).

काही शब्दांमधील अनुस्वारांचा उच्चार अस्पष्ट असतो. कधी कधी तो उच्चारलादेखील जात नाही. उदा.–हंसणे, धांवणे, जेव्हां, कोठें, कधीं, कांहीं. अशा शब्दांवर अनुस्वार देऊ नये. ते 'हसणे, धावणे, जेव्हा, कोठे, कधी, काही' असे लिहावे.

**नियम २ :** य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह् यांच्या पूर्वी येणाऱ्या अनुस्वारांबद्दल केवळ शीर्षबिंदू द्यावा. उदा.–सिंह, संयम, मांस.

उच्चारानुसारी लेखन करावयाचे म्हणून 'सिंह' ऐवजी 'सिंव्ह', 'संयम' ऐवजी 'संय्यम', 'मांस' ऐवजी 'मांव्स', 'संहार' ऐवजी 'संव्हार' असे लिहिण्याची गरज नाही. अनुस्वाराचा स्पष्ट व पूर्ण उच्चार केला असता वरील शब्दात 'य' किंवा 'व' या वर्णाचा उच्चार आपोआपच होतो. त्यामुळे येथे तो वर्ण लिहिण्याची गरज नसून त्याऐवजी अनुस्वार देणे पुरेसे आहे. म्हणून सिंह, संयम, मांस, सारांश, संशोधक, संस्था, स्वयंशासित यांसारख्या शब्दांमध्ये केवळ अनुस्वार द्यावा.

'ज्ञ' पूर्वीचा नासोच्चारही वरीलप्रमाणे शीर्षबिंदूने दाखवावा. उदा.–संज्ञा.

**नियम ३ :** नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर विभक्तिप्रत्यय व शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार द्यावा. उदा.–लोकांना, मुलांनी, तुम्हांस, लोकांसमोर, घरांपुढे.

नामाला किंवा सर्वनामाला विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लागण्यापूर्वी त्याचे जे रूप होते त्याला 'सामान्यरूप' असे म्हणतात. उदा.–'पत्र' या शब्दाला तृतीया विभक्तीचा प्रत्यय लावल्यास 'पत्राने' असे रूप होते. यातील 'पत्रा' हे सामान्यरूप होय.

या नियमानुसार, नामाच्या व सर्वनामाच्या अनेकवचनातील सामान्यरूपांवर विभक्तिप्रत्यय लावताना किंवा शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार द्यावयाचा आहे. उदा.–आदेशांत, विभागांकडून, सदस्यांच्या, पुस्तकांवर, सूचनांची, त्यांच्याकडून यांसारख्या शब्दांच्या बाबतीत अनुस्वार देणे आवश्यक आहे. शब्दाच्या एकवचनी सामान्यरूपावर अनुस्वार देऊ नये. अनेकवचनी सामान्यरूपावर अनुस्वार दिल्यानेच एकवचन व अनेकवचन यांतील भेद स्पष्ट होतो. घरातील (ए.व.)–घरांतील (अ.व.), पुस्तकाचा (ए.व.)–पुस्तकांचा (अ.व.), त्याच्याकडून (ए.व.)–त्यांच्याकडून (अ.व.) या उदाहरणांवरून हे दिसून येईल.

आदरार्थी बहुवचनाच्या वेळीही असा अनुस्वार दिला पाहिजे. उदा.–राज्यपालांचे अभिभाषण, मुख्यमंत्र्यांचा दौरा, तुम्हांला, आपणांस.

**नियम ४ :** वरील नियमांव्यतिरिक्त कोणत्याही कारणांसाठी व्युत्पत्तीने सिद्ध होणारे वा न होणारे अनुस्वार देऊ नयेत.

या नियमानुसार स्पष्ट किंवा अस्पष्ट उच्चार न होणारा कोणताही अनुस्वार शब्दांवर द्यावयाचा नाही. उदा.–घरें, रूपें, नामें, पांच, करणें, बोलणें, काळीं, नांव, कां, कीं, कांच, वांचणे, जेव्हां, तेव्हां, जों, तों, कांही, घरीं, लिपिकानें यांसारख्या शब्दांत अनुच्चारित अनुस्वार देण्याची आता गरज नाही.

## (२) ऱ्हस्व-दीर्घ

**नियम ५ :** मराठीतील तत्सम इकारान्त आणि उकारान्त शब्द दीर्घान्त लिहावे. उदा.–कवी, मती, गती, गुरू. इतर शब्दांच्या अंती येणारा इकार व उकार दीर्घ लिहावा. उदा.–पाटी, जादू, पैलू, विनंती, ही (शब्दयोगी अव्यय). अपवाद :–आणि, नि.

स्पष्टीकरण–परंतु, यथामति, तथापि इत्यादी तत्सम अव्यये ऱ्हस्वान्त लिहावी. तसेच, सामासिक शब्दांतही तत्सम (ऱ्हस्व) इकारान्त व उकारान्त शब्द पूर्वपद असताना ऱ्हस्वान्तच लिहावे. उदा.–बुद्धिवैभव, कविमन, गतिशील.

मराठी भाषेत ऱ्हस्व-दीर्घ लेखनासंबंधी काही नियम आहेत. परंतु, लिहिणाऱ्यांकडून घाईगर्दीत बऱ्याच वेळा हे नियम काटेकोरपणे पाळले जात नाहीत. मराठी भाषेत संस्कृत भाषेतील बरेच शब्द जसेच्या तसे स्वीकारले गेले आहेत. उदा.–कवि, मति, गति, गुरु, वस्तु, निवृत्ति, नियुक्ति, इत्यादी. हे शब्द संस्कृत असून मराठीत वापरल्या जाणाऱ्या अशा मूळ संस्कृत शब्दांना 'तत्सम' शब्द म्हणतात.

असे इकारान्त व उकारान्त शब्द मराठीत वापरताना ते दीर्घान्त लिहावेत. म्हणजे 'कवि', 'वस्तु', 'नियुक्ति' हे शब्द 'कवी', 'वस्तू', 'नियुक्ती' असे लिहावेत.

व्यक्तिनामे, ग्रंथनामे, शीर्षके व सुटे ऱ्हस्वान्त तत्सम शब्द मराठीत दीर्घान्त लिहावे. उदा.–हरी, भवभूती, मनुस्मृती, द्विबिंदु वर्गीकरण पद्धती, कृषी, कुलगुरू इत्यादी.

मराठी भाषेतील पाटी, जादू, पैलू, विनंती, ही (शब्दयोगी अव्यय) यांसारखे शब्द नियमाप्रमाणे दीर्घान्त लिहिण्यात यावेत. असे असले तरी, 'आणि' व 'नि' ही मराठीतील दोन अव्यये ऱ्हस्वान्त लिहावी. तसेच मूळ संस्कृतातून आलेली 'परंतु, यथास्थिति, तथापि, अद्यापि, इति, प्रभृति, कदापि,' यांसारखी (तत्सम) अव्यये ऱ्हस्वान्तच लिहावीत. या अपवादाप्रमाणेच सामासिक शब्द लिहिताना समासाचे पूर्वपद (पहिला शब्द) तत्सम ऱ्हस्वान्त शब्द असेल (म्हणजेच मुळात संस्कृतात ऱ्हस्वान्त असेल) तर ते पूर्वपद ऱ्हस्वान्तच लिहावयाचे आहे. दीर्घान्त असेल तर ते दीर्घान्त लिहावयाचे आहे. उदाहरणार्थ 'बुद्धी', हा शब्द दीर्घान्त लिहावयाचा आहे. मुळात संस्कृतमध्ये तो ऱ्हस्वान्त असल्याने 'बुद्धिचातुर्य' 'बुद्धिवैभव' असे सामासिक शब्द लिहिताना मात्र तो ऱ्हस्वान्त लिहावयाचा आहे हे लक्षात ठेवणे जरुरीचे आहे. 'अणू' हा शब्द मराठीमध्ये दीर्घान्त, परंतु 'अणुशक्ती' मध्ये तो ऱ्हस्वान्त होईल. याच धर्तीवर लिहिण्यात येणारे पुढील काही शब्द अभ्यासण्यासारखे आहेत. उदा.–निवृत्तिवेतन, विधिनिषेध, वस्तुस्थिती, कृतिसमिती, स्थितिशील, प्राप्तिकर, कृषिविषयक, नियुक्तिपत्र, समितिकक्ष, इत्यादी. या शब्दांमध्ये पूर्वपद असलेले संस्कृत शब्द मराठी भाषेने आत्मसात केल्यामुळे ते मराठीच्या प्रकृतीनुसार एरव्ही दीर्घान्त लिहावयाचे असले तरी समासामध्ये ते मूळ स्वरूपात योजलेले असल्याने ते ऱ्हस्वान्तच लिहावे. 'षष्ट्यब्दी' हा शब्द मुळातच दीर्घान्त आहे. 'षष्ट्यब्दी' यातील घटक, षष्टि + अब्द म्हणजेच षष्ट्यब्द. त्याचे स्त्रीलिंगी रूप षष्ट्यब्दी, षष्ट्यब्दीची पूर्ती ती षष्ट्यब्दीपूर्ती. म्हणून, षष्ट्यब्दीपूर्ती या सामासिक शब्दामध्ये तो दीर्घान्तच लिहिला जाईल. त्याचप्रमाणे 'शताब्दी' हा शब्ददेखील मुळात दीर्घान्त असल्याने 'शताब्दी समारोह' या सामासिक शब्दामध्ये तो दीर्घान्तच लिहावा लागेल. 'वधूवर' या सामासिक शब्दातील पूर्वपद (म्हणजे पहिला शब्द) दीर्घान्त राहील.

साधित शब्दांनाही हाच नियम लावावा. उदा.–शक्तिमान, गतिमान, इंदुमती, मृदुतर, इत्यादी.

विद्यार्थिन्, गुणिन्, प्राणिन्, पक्षिन्, यांसारखे इन्-अन्त शब्द मराठीत येतात. त्यांच्या शेवटी असलेल्या 'न्' चा लोप होतो व उपान्त्य ऱ्हस्व अक्षर दीर्घ होते. उदा.–विद्यार्थी, गुणी, प्राणी, पक्षी, मंत्री, स्वामी. परंतु हे शब्द समासात पूर्वपदी आले असता (म्हणजेच समासातील पहिला शब्द असता) ते ऱ्हस्वान्तच ठेवावे. उदा.–विद्यार्थिमंडळ, गुणिजन, प्राणिसंग्रह, मंत्रिमंडळ, स्वामिनिष्ठा.

मराठी शब्दकोशात मात्र तत्सम (ऱ्हस्व) इकारान्त व उकारान्त शब्द ऱ्हस्वान्त लिहिणे इष्ट ठरेल. जसे--पद्धति, अनुमति, प्रतिकृति, दृष्टि, अणु, वायु, हेतु, वगैरे. परंतु असे शब्द कोशाबाहेर वापरताना दीर्घान्त लिहिले पाहिजेत.

**नियम ६ :** (दीर्घ) ईकारान्त व ऊकारान्त शब्दांतील उपान्त्य इकार व उकार ऱ्हस्व लिहावे. उदा.–गरिबी, माहिती, हुतुतू, सुरू. अपवाद–नीती, भीती, रीती, कीर्ती, इत्यादी दीर्घान्त झालेले तत्सम शब्द.

वरील नियमात अपवाद म्हणून दिलेल्या शब्दांप्रमाणेच प्रीती, दीप्ती, विभूती, ऊर्मी यांसारखे आणखी काही दीर्घान्त झालेले संस्कृत शब्द आहेत.

नवीन नियमाप्रमाणे हे शब्द दीर्घान्तच लिहावयाचे आहेत. परंतु, त्यामुळे ते मुळात दीर्घ मानले जाण्याची शक्यता असल्यानेच त्यांचा अपवाद म्हणून स्वतंत्रपणे उल्लेख केला आहे. हे शब्द निती, भिती, रिती, किर्ती, प्रिती, दिप्ती, विभुती, उर्मी असे लिहू नयेत. या शब्दांतील उपान्त्य अक्षरे मुळात संस्कृतात जशी दीर्घ आहेत तशी दीर्घच ठेवावी.

ऊकारान्त शब्दांच्या बाबतीतही त्याच्या अलिकडचा स्वर ऱ्हस्व आढळतो. जसे : सुरू, हुतुतू, झुरू, मुरू, पुरू, इत्यादी. यांतील उपान्त्य स्वर ऱ्हस्व आहेत.

हाच नियम अकारान्त, एकारान्त व ओकारान्त शब्दांनाही लागू आहे. उदा.–खिळा, सुळा, पाहिले, मिळवतो, इत्यादी. पण तत्सम शब्दांना हा नियम लागू नाही. उदा.–ऊर्जा, ऊष्मा, पूजा, परीक्षा, प्रतीक्षा, इत्यादी.

यावरून असे म्हणता येईल की, मराठीमध्ये शब्दातील शेवटचे अक्षर दीर्घ असेल तर त्याचा उपान्त्य (म्हणजेच शेवटच्या अक्षराच्या अलिकडचा) इकार व उकार ऱ्हस्व असतो. मात्र तत्सम शब्दांना हा नियम लागू नाही.

**नियम ७ :** अकारान्त शब्दांचे उपान्त्य इकार व उकार दीर्घ लिहावे. उदा.–गरीब, वकील, वीट, सून, वसूल. अपवाद : ऱ्हस्वोपान्त्य अकारान्त तत्सम शब्द. उदा.–गुण, विष, मधुर, प्रचुर.

या नियमानुसार अकारान्त शब्दांचे उपान्त्य इकार किंवा उकार दीर्घ लिहावयाचे आहेत. उदा.–ठरीव, भरीव, फकीर, हुरूप, फूल, मूल, धूळ, कूळ, भूल, चूल, सूर, पूर, इत्यादी.

अपवाद म्हणून दिलेल्या शब्दांप्रमाणे मनुष्य, बहुत, विपुल, अंकुर, अद्‌भुत, विधुर, जटिल, मलिन, कुटिल, साहित्य, उचित, मंदिर, विहित, जीवित, शारीरिक, मानसिक, इत्यादी तत्सम (मुळात संस्कृत असलेले) शब्द मात्र ऱ्हस्वोपान्त्य लिहावयाचे आहेत.

मराठी शब्दांतील अनुस्वार, विसर्ग किंवा जोडाक्षर यांच्या पूर्वीचे इकार व उकार सामान्यतः ऱ्हस्व असतात. उदा.–भिंग, पिंप, नारिंग, गुंज, धुंद, सुंठ, खुंटी, कुंची, निःपक्षपातीपणे, छिः, थुः, भिस्त, विस्तव, मुक्काम, इत्यादी. परंतु तत्सम शब्दांत ते मुळाप्रमाणे ऱ्हस्व किंवा दीर्घ लिहावेत. उदा.–चित्र, पुण्य, पुत्र, वरिष्ठ, तीक्ष्ण, पूज्य, इत्यादी.

मागील नियम ३ मध्ये आपण सामान्यरूप म्हणजे काय हे पाहिले आहे. असे सामान्यरूप होताना स्वरांमध्ये जे ऱ्हस्व-दीर्घ बदल घडतात त्यासंबंधीचे विवेचन पुढील नियमात केले आहे.

**नियम ८ :** उपान्त्य दीर्घ ई-ऊ असलेल्या शब्दांचा उपान्त्य ईकार-ऊकार उभयवचनी सामान्यरूपाच्या वेळी ऱ्हस्व लिहावा. उदा.–गरिबास, वकिलांना, सुनेला, वसुलाची, नागपुरास.
अपवाद : दीर्घोपान्त्य तत्सम शब्द. उदा.–शरीरात, गीतेत, सूत्रास, जीवास.

या नियमानुसार गरीब-गरिबास, वकील-वकिलांना, सून-सुनेला, वसूल-वसुलाची, नागपूर-नागपुरास या शब्दांप्रमाणेच समजूत-समजुतीने, निवडणूक-निवडणुकीत, तपशील-तपशिलात, इत्यादी शब्दांतील उपान्त्य ईकार व ऊकार एकवचनी व बहुवचनी सामान्यरूपाच्या वेळी ऱ्हस्व लिहावा लागतो.

परंतु शब्द तीन अक्षरी असून त्याचे पहिले अक्षर दीर्घ असेल तर अशा शब्दाच्या सामान्यरूपात उपान्त्य ई-ऊ यांच्या जागी "अ" आल्याचे दिसते. उदा.–तालीम–तालमीचा, तालमीत, बेरीज–बेरजला, बेरजेत, पाटील–पाटलाने, पाटलाचा, माणूस–माणसाला, माणसाचा, लाकूड–लाकडाने, लाकडाचा, इत्यादी. या ठिकाणी वरील नियम लागत नाही. मात्र पहिले अक्षर ऱ्हस्व असल्यास हा 'अ' विकल्पाने होतो. म्हणून जेव्हा विकल्पामुळे 'अ' आदेश करण्यात येत नाही, तेव्हा वरील नियम लागू झाल्याने उपान्त्य ई-ऊ ऱ्हस्व होतात. उदा.–परीट–परटास, परिटास.

उपान्त्य 'ई-ऊ' असलेल्या तत्सम (म्हणजेच मुळात संस्कृत असलेल्या) शब्दांच्या बाबतीतही वरील नियम लागू करता येणार नाही. उदा.–परीक्षा, वीर, गीत, दूत, सूत्र, शरीर, रीती, पूर्व, विद्यापीठ, न्यायाधीश या शब्दांची सामान्यरूपे होताना परिक्षेत, विराने, गितात, दुतास, सुत्रातील, शरिरास, विद्यापिठाने, न्यायाधिशाचा अशी रूपे होत नाहीत. त्यांतील ई व ऊ हे स्वर दीर्घच राहतात. त्यांची परीक्षेत, वीराने, गीतात, दूतास, सूत्रातील, शरीरास, विद्यापीठाने, न्यायाधीशाचा ही योग्य रूपे होत.

इतर काही विशेष.

शब्दाचे उपान्त्य अक्षर 'ई' किंवा 'ऊ' असेल तर सामान्यरूपात 'ई' च्या जागी 'य' येतो किंवा 'ऊ' च्या जागी 'व ' येतो. उदा.–फाईल–फायलीत, काईल–कायलीत, देऊळ–देवळात, पाऊस–पावसात.

पुल्लिंगी शब्दाच्या शेवटी 'सा' असल्यास सामान्यरूपाच्या वेळी 'शा' होतो, ('श्या' होत नाही). उदा.–पैसा–पैशाचा, घसा–घशाचा, ससा–सशाचा.

पुल्लिंगी शब्दांच्या शेवटी असलेला 'जा' सामान्यरूपात तसाच राहतो, (त्याचा 'ज्या' होत नाही). उदा.–मांजा–मांजाने, गांजा–गांजाने, सांजा–सांजाची.

मधल्या अक्षरातील 'क' किंवा 'प' चे द्वित्व सामान्यरूपाच्या वेळी निघून जाते. उदा.–रक्कम–रकमेचा, तिप्पट–तिपटीने.

मधल्या 'म' पूर्वीचे अनुस्वारसहित अक्षर अनुस्वारविरहित होते. उदा.–अंमल–अमलात, किंमत–किमतीचा, गंमत–गमतीने, हिंमत–हिमतीने.

ऊकारान्त विशेषनामाचे सामान्यरूप होत नाही. उदा.–गणू–गणूस, शकू–शकूस.

धातूला 'ऊ' किंवा 'ऊन' प्रत्यय लावताना धातूच्या शेवटी 'व' असेल तरच 'वू' किंवा 'वून' होईल. उदा.–चाव–चावू–चावून, लाव–लावू–लावून, जेव–जेवू–जेवून, खा–खाऊ–खाऊन, गा–गाऊ–गाऊन, पी–पिऊ–पिऊन, धू–धुऊ–धुऊन.

## (३) किरकोळ

**नियम ९ :** पूर हा ग्रामवाचक शब्द कोणत्याही ग्रामनामास लावताना दीर्घोपान्त्य लिहावा. उदा.–नागपूर, संबळपूर, तारापूर.

संस्कृतात 'शहर' याअर्थी 'पुर' हा शब्द प्रचलित आहे. तोच मराठीत 'पूर' असा दीर्घोपान्त्य लिहिला जातो. मराठीतील उच्चारपद्धतीला हे धरून आहे. त्यामुळे गावांची नावे वरीलप्रमाणे लिहिण्यात यावीत.

**नियम १० :** कोणता, एखादा ही रूपे लिहावी; कोणचा, एकादा ही रूपे लिहू नयेत.

**नियम ११ :** हळूहळू, मुळूमुळू, खुटूखुटू या शब्दांतील दुसरा स्वर व चौथा स्वर दीर्घ लिहावा.

वरील शब्दांप्रमाणेच तसूतसू, झुंजूमुंजू, चिरीमिरी यांसारख्या पुनरुक्त शब्दांतील ऊकार व ईकार मूळ घटक शब्दांमध्ये ते दीर्घ असल्याने दीर्घ लिहावे. परंतु, पुनरुक्त शब्द नादानुकारी असतील तर ते उच्चाराप्रमाणे ऱ्हस्व लिहावे. उदा.–लुटुलुटु, दुडुदुडु, रुणुझुणु.

**नियम १२ :** एकारान्त नामाचे सामान्यरूप याकारान्त करावे. उदाहरणार्थ.–करण्यासाठी, फडक्यांना (म्हणजे फडके यांना), पाहण्याला. अशा रूपांऐवजी करणेसाठी, फडकेंना, पाहणेला यांसारखी एकारान्त सामान्यरूपे करू नयेत.

एकारान्त सामान्यरूपे आज फारशी प्रचलित नाहीत. त्यांऐवजी याकारान्त सामान्यरूपे वापरली जातात. म्हणून यांचेकडे, कळवणेसाठी, करणेबाबत यांसारखी रूपे वापरू नयेत.

**नियम १३ :** लेखनात पात्राच्या किंवा वक्त्याच्या तोंडी बोलण्याची भाषा घालावी लागते. त्या वेळी तिचे स्वरूप बोलण्यातील उच्चाराप्रमाणे असावे. अन्य प्रसंगी तसे लिहू नये.

नाटकात किंवा कथा-कादंबरीत पात्रांच्या तोंडी, "असं केलं", "असं झालं", "मी म्हटलं" असे लिहिण्यास हरकत नाही. एरव्हीच्या लेखनात तसे लिहू नये. वरीलप्रमाणे बोली भाषेची रूपे वापरताना अकारान्त रूपे अनुस्वारयुक्त लिहिणे आवश्यक आहे.

**नियम १४ :** क्वचित्, कदाचित्, अर्थात्, अकस्मात्, विद्वान्, इत्यादी रूढ झालेले तत्सम शब्द अकारान्त लिहावे.

मराठीत रूढ झालेले संस्कृत शब्द सामान्यतः जसेच्या तसे लिहिण्याची पद्धत आहे. त्यांतील काही शब्द मुळात व्यंजनान्त आहेत. त्यानुसार वरील शब्द क्वचित्, कदाचित्, अर्थात्, अकस्मात् असे लिहिण्याचा प्रघात होता. परंतु मराठीच्या प्रकृतीनुसार विद्वान, कीर्तिमान, शक्तिमान यांसारखे शब्द स्वरान्त लिहिण्याचीही पद्धत रूढ होती व आहे. काही वेळा 'अर्थात्', 'क्वचित्' या अव्ययांपुढे 'च' हे अव्यय वापरण्यात येते. त्या वेळी 'अर्थातच', 'क्वचितच' असे लिहावे लागते. त्यामुळे वरील प्रकारात मोडणारे सर्व शब्द स्वरान्त लिहिण्यात यावेत. असे आणखी काही शब्द पुढीलप्रमाणे आहेत. जसे :- किंचित, तद्वत, दैववशात, श्रीमान, धनवान, भगवान, विद्युत, परिषद, संसद, सम्राट, इत्यादी.

कोणत्याही अन्य भाषेतील शब्द लिहिण्याची गरज पडेल तेव्हा त्या भाषेतल्या उच्चाराप्रमाणे लेखन करावे.

इंग्रजी शब्द, पदव्या किंवा त्यांचे संक्षेप यांच्या शेवटचे अकारान्त अक्षर आता व्यंजनान्त (म्हणजेच पायमोडके) लिहू नये. उदा.–वॉटसन, बायरन, कीट्स, एम. एल. सी., पीएच.डी., इत्यादी.

**नियम १५ :** केशवसुतपूर्वकालीन पद्य व विष्णुशास्त्री चिपळूणकर पूर्वकालीन गद्य यांतील उतारे छापताना ते मुळानुसार छापावे. तदनंतरचे (केशवसुत व चिपळूणकर यांच्या लेखनासह) लेखन मराठी साहित्य महामंडळाच्या प्रस्तुत लेखनविषयक नियमांस अनुसरून छापावे.

**नियम १६ :** राहणे, पाहणे, वाहणे अशी रूपे वापरावी. रहाणे–राहाणे, पहाणे–पाहाणे, वहाणे–वाहाणे अशी रूपे वापरू नयेत. आज्ञार्थी प्रयोग करताना 'राहा, पाहा, वाहा' यांजबरोबरच 'रहा, पहा, वहा' ही रूपे वापरण्यास हरकत नाही.

**नियम १७ :** 'इत्यादी' व 'ही' (अव्यय) हे शब्द दीर्घान्त लिहावे. 'अन्' हा शब्द व्यंजनान्त लिहावा.

'इत्यादी' हे अव्यय नसून विशेषण आहे. त्यामुळे ते दीर्घान्त लिहावे.

**नियम १८ :** पद्यात वृत्ताचे बंधन पाळताना ऱ्हस्व-दीर्घाच्या बाबतीत हे नियम काटेकोरपणे पाळता येणे शक्य नसल्यास कवीला तेवढ्यापुरते स्वातंत्र्य असावे.

# वाक्यरचना

मराठी वाक्यरचना करताना कर्ता, कर्म, क्रियापद, विशेषणे या पदांचा परस्परसंबंध नीट व्यक्त करण्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. लिहिण्याच्या ओघात कधीकधी वाक्याची सुरुवात व त्याचा शेवट यांमध्ये मेळ राहत नाही. उदा.–"शासनाने.....मान्यता देण्यात आली." अशा प्रकारची वाक्यरचना चुकीची आहे. ही चूक अर्थात अभावितपणेच घडते. पण त्यामुळे संपूर्ण वाक्याचा तोल बिघडून जातो व वाक्यरचना बेडौल होते. या चुका कशा स्वरूपाच्या असतात व त्या कशा टाळाव्यात याचा ऊहापोह पुढील परिच्छेदांत उदाहरणासहित केलेला आहे.

मराठी भाषेत वाक्यरचना करताना वाक्याच्या अगोदरच्या भागाचा नंतरच्या भागाशी संबंध दाखवताना 'जो....तो', 'जे....ते', 'जी....ती', 'ज्या....त्या', यांसारख्या संबंधी सर्वनामांचा जोडीने वापर करण्यात येतो. मात्र, या दोन्ही सर्वनामांचा संबंध एकाच नामाशी दर्शवावयाचा असतो. हा नियम नीट पाळला गेला नाही तर वाक्याचा तोल बिघडतो; इतकेच नव्हे तर कधी कधी वाक्याचा अर्थही बदलतो. हे पुढील उदाहरणावरून दिसून येईल :–

'जो खर्च विभागप्रमुखांनी करावयाचा आहे त्यांची नावे खाली नमूद केली आहेत.'

या वाक्यातील सुरुवातीचा भाग हा 'खर्च' या शब्दाविषयी माहिती देतो, तर नंतरच्या भागातील 'त्यांची' हा शब्द विभागप्रमुखाला उद्देशून वापरलेला आहे. वास्तविक, 'जो' या सर्वनामाने 'खर्च' या शब्दास प्राधान्य दिले आहे. यावरून उत्तरार्धात 'तो खर्च....' अशी रचना अपेक्षित होती. परंतु नंतरच्या भागात 'खर्चा' ऐवजी 'विभागप्रमुखा' संबंधी माहिती देण्यात आली आहे. अशा परिस्थितीत, 'ज्या विभागप्रमुखांनी खर्च करावयाचा आहे त्यांची नावे खाली नमूद केली आहेत', अशी वाक्यरचना युक्त ठरेल.

कोणतेही विधान ठासून करण्यासाठी किंवा संबंधी सर्वनामावर जोर देण्यासाठी 'जो जो...तो तो', यांसारखी सर्वनामे दोन दोन वेळा योजण्यात येतात. 'जे जे....ते ते', 'जो जो....तो तो', 'ज्या ज्या वेळी.....त्या त्या वेळी', 'ज्यांनी ज्यांनी....त्यांनी त्यांनी' यांसारख्या संबंधी सर्वनामांच्या जोड्यांचा वापर करताना वर दर्शविल्याप्रमाणे वाक्यातील सुरुवातीचा अर्धा भाग व नंतरचा अर्धा भाग यांत समतोल राखणे आवश्यक असते. म्हणून जे सर्वनाम प्रथम जोडीने वापरलेले असेल त्याच्याशी सुसंगत अशी संबंधी सर्वनामांची जोडी नंतर वापरावी लागते. उदाहरणार्थ–

१. शासनाने जे जे फायदे आपल्या कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून दिले आहेत ते ते फायदे या रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनाही उपलब्ध करून द्यावेत.

२. राज्यातील जिल्ह्यांमध्ये ज्या ज्या वेळी अवर्षणामुळे टंचाईची परिस्थिती निर्माण होते त्या त्या वेळी निधीतून पैसा उपलब्ध करून देण्यात येतो.

'जर....तर' ही अव्यये संकेत दर्शवण्यासाठी वाक्यात जोडीने वापरली जातात. उदाहरणार्थ–

१. जर समितीने वरील खर्चास मान्यता दिली तर प्रकल्पाचे काम वेगाने पूर्ण करता येईल.

२. जर कर्मचाऱ्याने कमीतकमी वीस वर्षे अखंड सेवा केली असेल तर त्याला निवृत्तिवेतन मिळू शकेल.

'जर....तर' या संकेतदर्शक अव्ययांचा वाक्यात उपयोग करताना काही वेळा पुढील चुका घडण्याचा संभव असतो. त्या म्हणजे–

१. जर अभियांत्रिकी विभागाने तपासणी केल्यास याबाबतचा निश्चित खर्च किती होईल ते अजमावता येईल.

२. जर या प्रकल्पांच्या खर्चाचा बारकाईने विचार करताना कर्मचारीवर्ग, यंत्रसामग्री, साधनसामग्री, इत्यादी गोष्टीही विचारात घेतल्या पाहिजेत.

वरील दोन्ही उदाहरणांवरून 'जर' या संकेतदर्शकाचा उपयोग कसा अनावश्यक ठरतो हे लक्षात येईल. 'केल्यास', 'करताना' यांसारखी क्रियापदाची संकेतदर्शक रूपे वापरावयाची असतील तर तेथे 'जर...तर' ची योजना निरुपयोगी ठरते.

'जरी....तरी' या जोडीचा वापर वाक्यातील विधानांमधील विरोध दर्शविण्यासाठी केला जातो. उदाहरणार्थ–

१. जरी यावर्षी पीक चांगले असले तरी पुढील वर्षाच्या दृष्टीने हा धान्यसाठा कमीच पडेल.

२. जरी या जिल्हा उद्योग केंद्रास प्रशासनिक मंजुरी देण्यात आली असली तरी या केंद्राचे काम अद्यापपर्यंत सुरू झालेले नाही.

काही ठिकाणी वाक्याच्या सुरुवातीस 'जर, जरी' यांसारखी संकेतदर्शक अव्यये वापरलेली नसतात. परंतु वाक्याच्या उत्तरार्धात 'तर, तरी' यांचा वापर केलेला असतो. अशा वाक्यांमध्ये 'जर' किंवा 'जरी' हे संकेतदर्शक अध्याहृत असल्यामुळे ती वाक्ये रचनेच्या दृष्टीने निर्दोष ठरतात.

'ज्याप्रमाणे....त्याप्रमाणे', 'जेव्हा जेव्हा....तेव्हा तेव्हा', 'जेथे जेथे....तेथे तेथे', 'जितके....तितके', 'जोवर....तोवर' या सर्व अव्ययांचा वापरदेखील जोडीने करण्यात आल्यास त्यायोगे वाक्याचा तोल कायम राखला जातो. उदाहरणार्थ–

१. या नियमांखालील लाभ ज्याप्रमाणे राजपत्रित अधिकाऱ्यांना मिळावयाचे आहेत त्याचप्रमाणे अराजपत्रित कर्मचाऱ्यांनाही मिळावयाचे आहेत.

२. जेव्हा जेव्हा अपुऱ्या पावसामुळे राज्यात टंचाई निर्माण होते तेव्हा तेव्हा शेतकऱ्यांना शासनाकडून मदत देण्यात येते.

३. जोवर आदिवासी क्षेत्रातील दूध गोळा करण्याचे प्रमाण कमी आहे तोवर ही योजना त्या क्षेत्रातील दुग्धशाळा संस्थांना किफायतशीर ठरणार नाही.

काही वेळा मिश्र किंवा संयुक्त वाक्यात कर्ता एक असला तरी क्रियापदे दोन वापरलेली असतात. ती दोन्ही क्रियापदे वास्तविक, कर्त्याच्या विभक्तीप्रमाणे पाहिजेत. तथापि, लिहिण्याच्या ओघात काही वेळा ही क्रियापदे एकाच प्रयोगातील न राहता वेगवेगळ्या रूपांत योजली जातात. त्यामुळे कर्तरि प्रयोगात सुरू होणारे वाक्य कर्मणि प्रयोगात पूर्ण केले जाते. त्यामुळे वाक्यरचना कशी सदोष होते हे पुढील उदाहरणांवरून दिसून येईल :–

१. प्रादेशिक विकास महामंडळ अर्जाची छाननी करील व अर्थसहाय्यासाठी शिफारस करण्यात येईल.

२. थळ येथे रासायनिक खत प्रकल्प राष्ट्रीय केमिकल्स या संस्थेमार्फत उभारत आहे.

पहिल्या उदाहरणात 'महामंडळ छाननी करील' हा कर्तरि प्रयोग आहे. शिफारस करणारे देखील महामंडळच असल्याने, म्हणजे दोन्ही क्रियापदांचा कर्ता एकच असल्यामुळे 'करण्यात येईल', याऐवजी 'करील' अशी शब्दयोजना हवी. अशी शब्दयोजना केल्याने वाक्याची सुरुवात कर्तरि प्रयोगात व शेवट कर्मणि प्रयोगात हा दोष टळेल.

दुस-या उदाहरणात 'प्रकल्प' हे कर्म असल्यामुळे, 'राष्ट्रीय केमिकल्स या संस्थेमार्फत उभारत आहे' ही रचना सदोष आहे. '.... संस्था उभारत आहे', किंवा '....संस्थेमार्फत उभारण्यात येत आहे', अशी रचना योग्य ठरेल.

वाक्यामधील कर्मपदासाठी जेथे भिन्न लिंगातील दोन किंवा तीन शब्दांचा संयुक्तपणे वापर केला असेल तेथे क्रियापद हे कर्मपदातील शेवटच्या शब्दाच्या लिंगवचनानुसार योजण्यात यावे. उदाहरणार्थ–

१. या योजनेखाली पुढील जिल्ह्यांमध्ये पूल, रस्ते, घरे व इमारती बांधण्यात आल्या आहेत.

२. पडीत जमीन लागवडीखाली आणण्यासाठी चांगल्या दर्जाची खते, बी-बियाणे व नांगर वापरावे लागतील.

३. विद्यार्थ्यांना या योजनेनुसार पुस्तके, नकाशे व वह्या मिळाल्या.

## शब्दयोजना

शासनव्यवहारात टिप्पण्या, पत्रे, ज्ञापने, निर्णय, इत्यादींचे लेखन करताना वाक्यरचना शक्य तितकी सोपी, सुटसुटीत ठेवणे आवश्यक असते. शब्दांची निवड चोखंदळपणे केल्यास लेखनात निश्चित अर्थ साधता येतो. शब्द सोपे व सर्वांना समजतील असे असावेत. त्यांच्या अर्थाबाबत संदिग्धता असू नये.

बऱ्याच वेळा प्रशासकीय कामकाजामध्ये 'कायदा' या शब्दाचा वापर ' Act ' या अर्थी करण्यात येतो. वास्तविक 'कायदा' या शब्दाचा अर्थ व्यापक असून तो ' Law ' या इंग्रजी शब्दासाठी योजण्यात येतो. या उलट ' Act ' या शब्दासाठी 'अधिनियम' हा पर्यायी शब्द योग्य आहे. असेच आणखी एक उदाहरण द्यावयाचे तर, ' Rules ' आणि ' Regulations ' वरील दोन्ही इंग्रजी संज्ञांसाठी मराठीत सरसकटपणे 'नियम' हा पर्याय वापरला जातो. याऐवजी वरील संज्ञांसाठी अनुक्रमे, 'नियम' व 'विनियम' असे वेगवेगळे शब्द योजल्यास दोन्ही शब्दांमधील भेदही लक्षात येतो. ' Tax ' आणि ' Duty ' या इंग्रजी शब्दांसाठी मराठीत 'कर' हा पर्यायी शब्द असाच वापरलेला आढळतो. त्याऐवजी अनुक्रमे 'कर' व 'शुल्क' असे पर्याय घेऊन भिन्नत्व दर्शवता येते.

' Respectively ' या इंग्रजी शब्दासाठी मराठी 'अनुक्रमे' हा पर्याय योजताना वाक्यरचना पुढीलप्रमाणे करावी लागते. उदाहरणार्थ :–

'वेतन, महागाई भत्ता व कार्यालयीन खर्च या तीन बाबींकरिता अनुक्रमे रु. ३०,०००, रु. २२,००० व रु. १,२५,००० इतका खर्च करावा लागेल.'

' as the case may be ' या वाक्प्रयोगासाठी मराठीत 'यथास्थिति' हा पर्याय योजण्यात येतो. 'यथास्थिति' या शब्दाचे वाक्यातील स्थान पुढीलप्रमाणे असले पाहिजे. उदाहरणार्थ.–

'भारत सरकारला किंवा राज्य सरकारला मिळालेल्या सर्व सरकारी रकमा, भारताच्या लोक लेख्यात किंवा 'यथास्थिति' राज्याच्या लोक लेख्यात जमाखाती टाकल्या जातील.'

हल्ली 'यथास्थिति' प्रमाणेच 'प्रकरणपरत्वे' हा शब्द सुद्धा वापरण्यात येतो. त्याचे स्थानही तसेच असले पाहिजे.

मराठीमध्ये ही, च, देखील, इत्यादी अव्यये शब्दांवर विशेष जोर देण्यासाठी जोडण्यात येतात. त्यावेळी त्यांची योजना योग्य शब्दांबरोबर करणे आवश्यक असते.

## विशेषण–विशेष्य संबंध

विशेषण हे, त्याचा ज्या शब्दाशी संबंध असेल त्या शब्दाच्या जवळ असावे. ते तसे नसेल तर वाक्याचा अर्थ बदलतो हे पुढील उदाहरणांवरून दिसून येईल :–

(१) 'भारताच्या पूरग्रस्त उत्तरेकडील राज्यांना मदत करण्यासाठी शासनाने समिती स्थापन केली आहे.' या वाक्यातील 'पूरग्रस्त' हे 'राज्य' या शब्दाचे विशेषण चुकीने अलिकडे योजले गेले आहे. वरील वाक्याची रचना 'भारताच्या उत्तरेकडील पूरग्रस्त राज्यांना मदत...' अशी करणे योग्य ठरेल.

(२) 'या खर्चात अतिरिक्त उतारूवरील करांपासून मिळालेल्या जादा रकमा समाविष्ट आहेत.' या वाक्यातील 'अतिरिक्त' हे विशेषण 'उतारू' या शब्दाचे नसून 'कर' या शब्दाचे आहे. म्हणून वरील वाक्याची रचना 'या खर्चात उतारूवरील अतिरिक्त करांपासून मिळालेल्या जादा रकमा समाविष्ट आहेत.' अशी असली पाहिजे.

विशेषणाप्रमाणे क्रियाविशेषणाच्या बाबतीतही त्याची योजना संबद्ध क्रियापदाच्या, विशेषणाच्या किंवा अन्य क्रियाविशेषणाच्या लगतपूर्वी असणे इष्ट ठरते.

## विशेषण–विशेष्याचा लिंग–वचन संबंध

वाक्यामध्ये विशेष्याचे जे लिंग-वचन असेल त्यानुसार विशेषणाचे लिंग-वचन बदलते हे पुढील उदाहरणांवरून दिसून येईल :–

(१) समाज जितका सुसंस्कृत तितकी ही पातळी वरची असते.

(२) नवी तथ्ये व नवे अनुभव व्यक्त करण्यासाठी निराळ्या अभिव्यक्ती शोधाव्या लागतात.

वरील उदाहरणांवरून, विकारी विशेषण हे लिंग व वचन यांच्याबाबतीत विशेष्यावरच अवलंबून असल्याचे स्पष्ट होते.

## वाक्यातील नाम व सर्वनाम यांचा लिंग–वचन संबंध

वाक्यात नामाचे एकवचन असेल तर त्याबरोबर वापरावयाचे सर्वनामदेखील एकवचनी, तसेच नाम अनेकवचनी असेल तर सर्वनामही अनेकवचनी व समानलिंगी असावे. उदाहरणार्थ–

(१) भाषा हे मानवी जीवनाचे एक अपरिहार्य अंग आहे.

(२) हे संकेत त्यांच्या आशयाशी कार्यकारणभावाने संबद्ध नसून परंपरागत आहेत.

मराठीतून लेखन करताना ब-याच वेळा वाक्यातील दोन नामांना प्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लावताना पहिले नाम तसेच ठेवून त्याच्या नंतरच्या नामाला प्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लावण्यात येते. ही वाक्यरचना कशी सदोष आहे हे पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल :-

'या योजनेखाली नवीन रस्ते व पुलाचे बांधकाम करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.'

या उदाहरणातील 'रस्ते' व 'पूल' या दोन्ही नामांना विभक्तिप्रत्यय लावणे आवश्यक होते, परंतु तसे न केल्यामुळे 'रस्ते' हे नाम प्रथमेत आहे व 'पुलाचे' या नामाला षष्ठीचा प्रत्यय लावण्यात आला आहे.

वरील वाक्याची रचना 'या योजनेखाली नवीन रस्त्यांचे व पुलांचे......' किंवा 'या योजनेखाली नवीन रस्ते व पूल यांचे बांधकाम करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.' अशी करणे योग्य ठरेल.

## लेखनदोष

शब्दाचे शुद्ध रूप माहीत नसल्यामुळे किंवा घाईगर्दीत लिहिल्यामुळे ब-याच वेळा लेखनदोष घडू शकतात. यांपैकी सामान्यपणे आढळून येणारे काही लेखनदोष खाली दर्शवले आहेत :-

| अशुद्ध | शुद्ध | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| अकस्मिक | आकस्मिक | आंग | अंग |
| अंगिकार | अंगीकार | आधीन | अधीन |
| अजीबात | अजिबात | आर्शिर्वाद | आशीर्वाद |
| अणूरेणू | अणुरेणू | आवश्य | अवश्य |
| अंतस्थ | अंतःस्थ | इतप्पर | इतःपर |
| अतित | अतीत | इंद्रीय | इंद्रिय |
| अतिथीगृह | अतिथिगृह | इष्ठ | इष्ट |
| अंतीम | अंतिम | इस्त्री | इस्त्री |
| अतैव | अतएव | ईयत्ता | इयत्ता |
| अत्त्याचार | अत्याचार | उच्चाटण | उच्चाटन |
| अत्यंतिक | आत्यंतिक | उणिव | उणीव |
| अत्यवश्यक | अत्यावश्यक | उणीवा | उणिवा |
| अंधःकार | अंधकार | उत्कृष्ठ | उत्कृष्ट |
| अधिकारीता | अधिकारिता | उदासिन | उदासीन |
| अधिक्षक | अधीक्षक | उदिम | उदीम |
| अनावृत्त (पत्र) | अनावृत (पत्र) | उधृत | उद्‌धृत |
| अनिर्णित | अनिर्णीत | उध्धार | उद्धार/उद्‌धार |
| अनिष्ठ/अनीष्ट | अनिष्ट | उपजिविका/उपजिवीका | उपजीविका |
| अनुवंशिक | आनुवंशिक | उपहारगृह | उपाहारगृह |
| अनुषंगिक | आनुषंगिक | उर्जितावस्था | ऊर्जितावस्था |
| अप्रतीम | अप्रतिम | उशिर | उशीर |
| अल्पसंख्यांक | अल्पसंख्याक | उशीरा | उशिरा |
| अवशिष्ठ | अवशिष्ट | उहापोह | ऊहापोह |
| अवश्यक | आवश्यक | ऊष्ण | उष्ण |
| अक्षरशहा | अक्षरशः | एकादा | एखादा |
| आकस्मात/आकस्मात् | अकस्मात | कनिष्ट | कनिष्ठ |
| आकृतीबंध | आकृतिबंध | कलम ३ नुसार | कलम ३ अनुसार |

| अशुद्ध | शुद्ध | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| कवयत्री/कवियत्री | कवयित्री | धारिष्ठ/धारिष्ट्य | धारिष्ट |
| कायदेशिरपणा | कायदेशीरपणा | नाविन्यता | नवीनता/नावीन्य |
| कि (अव्यय) | की | निगडीत | निगडित |
| कृत्रीम | कृत्रिम | निरिक्षक | निरीक्षक |
| केंद्रिय | केंद्रीय | निरोद्योगी | निरुद्योगी |
| केंद्रीत | केंद्रित | निर्भिड | निर्भीड |
| कोट्यावधी | कोट्यवधी/<br>कोट्यवधी | निःष्कारण | निष्कारण |
| | | निष्क्रीय | निष्क्रिय |
| क्रिडांगण | क्रीडांगण | निस्पृह | निःस्पृह |
| खंडीत | खंडित | नैपुण्यता | नैपुण्य/निपुणता/<br>निपुणत्व |
| गृहित | गृहीत | | |
| ग्रहपाठ | गृहपाठ | न्यायाधिश | न्यायाधीश |
| ग्रहीत | गृहीत | पडित | पडीत |
| जमिन | जमीन | पदसिध्द | पदसिद्ध/पदसिद्ध |
| ज्यादा | जादा | परिक्षण | परीक्षण |
| ज्येष्ट | ज्येष्ठ | परिक्षा | परीक्षा |
| टीपा | टिपा | परीनिरिक्षण | परिनिरीक्षण |
| तत्कालिक | तात्कालिक | परीव्यय | परिव्यय |
| तथापी | तथापि | पर्यात्प | पर्याप्त |
| ताप्तर्य | तात्पर्य | पारंपारिक | पारंपरिक |
| तृटी | त्रुटी | पाळिव | पाळीव |
| तैय्यारी | तयारी | पिकपाणी | पीकपाणी |
| दिपावली | दीपावली | पीकवणे | पिकवणे |
| दिर्घ | दीर्घ | पुर्तता | पूर्तता |
| दिलगिर | दिलगीर | पृथःकरण | पृथक्करण |
| दिलगीरी | दिलगिरी | पृष्ट | पृष्ठ |
| दुरदर्शी | दूरदर्शी | प्रतिक | प्रतीक |
| दृढिकरण | दृढीकरण | प्रतिक्षा | प्रतीक्षा |
| दैदिप्यमान | देदीप्यमान | प्रतिक्षित | प्रतीक्षित |
| द्रिष्टी | दृष्टी | प्रविण | प्रवीण |
| धर्मदाय | धर्मादाय | प्रसंगोपात | प्रसंगोपात्त |

| अशुद्ध | शुद्ध | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| प्राविण्य | प्रावीण्य | विषेश | विशेष |
| प्रित्यर्थ | प्रीत्यर्थ | विहीत | विहित |
| बगीचा | बगिचा | व्यक्तिशहा | व्यक्तिशः |
| मतितार्थ | मथितार्थ | शद्ब | शब्द |
| मंत्रीमंडळ | मंत्रिमंडळ | शिवकालिन | शिवकालीन |
| महत्व | महत्त्व | शिष्ठ | शिष्ट |
| मागसवर्ग | मागासवर्ग | शुध्द/शुध्ध | शुद्ध/शुद्ध |
| माहित | माहीत | षष्ठ्यब्दी | षष्ट्यब्दी |
| माहीती | माहिती | सकुंचित | संकुचित |
| मोहिम | मोहीम | संचनालय | संचालनालय |
| मोहीमा | मोहिमा | सत्व | सत्त्व |
| राजिनामा | राजीनामा | संयुक्तिक | सयुक्तिक |
| राज्यभाषा | राजभाषा | सर्वांगिण | सर्वांगीण |
| रुप | रूप | साहाय्यक | सहायक |
| वरिष्ट | वरिष्ठ | सिध्द | सिद्ध/सिद्ध |
| वर्गिय | वर्गीय | सृजन | सर्जन |
| विपरित | विपरीत | स्त्राव | स्राव |
| विविक्षित | विवक्षित | स्त्रोत | स्रोत |
| विशयी | विषयी | स्वत्त्व | स्वत्व |
| विशिष्ठ | विशिष्ट | स्विकार | स्वीकार |

**टीप :** वरील यादी परिपूर्ण नसून केवळ मार्गदर्शनादाखल आहे.

२०११

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - ४११ ००१.